# देतो तो देव

"देव" हा शब्द उच्चारल्याबरोबर प्रत्येकाच्या मनात त्याच्या आराध्याचे चित्र उभे राहते. काहींच्या मनात अनेक देवी-देवतांच्या प्रतिमा तरळू लागतात. परंतू प्रत्येकाने मानल्याप्रमाणे त्या स्वरुपाचा देव आहे काय? या प्रश्नाचा विचार करण्याची गरज आहे. देतो तो देव अशी एक सामान्य म्हण रुढ झालेली आहे. खरं आहे ते. देतो तोच देव. पण तो काय देतो हे आपण पाहत नाही. वास्तविक तो सर्वकाही देतो. या विश्वाचा निर्माताच तो आहे. विश्वाची निर्मिती, पालन आणि संहार त्याच्याच हातात आहे. तो जन्म देतो, जीवन देतो आणि मृत्यूही देतो. समर्थ रामदास स्वामींनी देवाच्या या दातृत्वाची व्याख्या करणारा एक अभंग लिहिला आहे. ते म्हणतात-

**पाहू जाता एक देव | तेणें निर्मियेले सर्व |**
**पृथ्वि सूर्य चंद्र तारे | सर्व त्याचीच लेकुरे |**
**अन्नपाणी तोचि देतो | प्रेमे सर्वां सांभाळीतो |**
**भावे भजा तया देवा | सर्व सुखाचा तो ठेवा |**

परमात्म्याच्या शाश्वत स्वरुपाचे ज्ञान झाल्यानंतरच समर्थांनी देवाची ही किमया वर्णन केलेली आहे. आता आपण विचार करायचा आहे की, जो देव सृष्टिनिर्माता आहे, पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे ही ज्याची लेकरे आहेत, मुंगीपासून हत्तीपर्यन्त जो सर्वांचा पोशिंदा आहे, ज्याचे सर्वांवर प्रेम आहे आणि जो सुखदाता आहे असा देव आपण समजतो तेवढा लहान असेल काय? मनुष्य अनेक रुपांमध्ये जे मानित आहे ती देवांची प्रतिकात्मक रुपे आहेत. या प्रतिकांच्या मागे लपलेला प्रत्यक्ष, मुर्तिमध्ये न मावणारा अमूर्त देव वेगळाच आहे. तो सर्वांहून निराळा आहे. समर्थांनी दासबोधामध्ये त्याचे वर्णन करताना म्हटले आहे-

**परब्रह्म सकळांहून वेगळें | परब्रह्म सकळांहून आगळें | नाना कल्पने निराळें | परब्रह्म तें || दास. 20/5**

या विश्वामध्ये अशी एकही वस्तु नाही की ज्याची उपमा त्या देवाला देता येईल. म्हणुनच त्या देवाला अनुपमेय म्हटलेले आहे. ज्याप्रमाणे भांड्यांची उपमा कुंभाराला देता येणार नाही किंवा दागिन्यांची उपमा देऊन सोनाराचे वर्णन करता येणार नाही. अगदी त्याचप्रमाणे या प्रकृतीतील कोणतीही उपमा परमात्म्याला लागू पडत नाही. हा परमात्मा स्वयंभू आहे. याला कोणीही बनविलेले नाही. भगवद्‌गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण या देवाच्या स्वरुपाविषयी लिहितात-

**न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता व न भूयः |**
**अजोऽनित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमानें शरीरे || - गीता 20/2**

(अर्थात, हा जन्मत नाही किंवा मरतही नाही. हा जन्मला होता व पुनः नाहीसा झाला असेही नाही. हा जन्मरहित, नित्य, शाश्वत पुराणपुरुष आहे. देहाचा नाश झाला तरी ह्याचा नाश होत नाही)

धर्म-ग्रंथ-शास्त्रांनी वर्णन केलेला आणि साधु-संतांनी अनुभवलेला हा देव आपल्यालाही मिळावा, अशी मात्र कोणाची इच्छा होत नाही. एखादी भौतिक वस्तू माणसाला हवी असेल तर तिच्या प्राप्तीसाठी मनुष्य जीवाचा आटा-पिटा करतो. भौतिक वस्तुंच्या प्राप्तीसाठी देवाच्या मुर्तीपुढे, प्रतिकापुढे साकडे घालतो. परंतू हा देवच मला मिळावा, अशी त्याची भावना बनत नाही. सद्‌गुरु निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज एक गोष्ट सांगतात की, एका राजाने एका बागेत बसून घोषणा केली की, या बागेतील ज्याला जी वस्तु आवडेल त्या वस्तुला त्याने हात लावावा. ती वस्तु त्याची होईल. ही घोषणा ऐकून हजारो लोक त्या बागेत आले आणि प्रत्येकाने आपापल्या आवडत्या वस्तुला हात लावून ती वस्तु घेऊन गेले. एक मनुष्य मात्र त्या बागेत सर्वत्र भटकत होता. परंतू कोणत्याही वस्तुला हात लावित नव्हता. फिरत फिरत तो राजाजवळ जाऊन पोहोचला.

राजाला त्याने एक प्रश्न विचारला. हे राजन या सर्व वस्तुंमध्ये आपणही सामील आहात काय? तेव्हा राजाने उत्तर दिले की, होय. या वस्तुंमध्ये मी देखिल सामील आहे. राजाने असे म्हणताच त्या व्यक्तीने राजालाच हात लावला. प्रदर्शनाच्या अटीनुसार राजा त्याचा झाला. आता राजाच त्याचा झाल्यामुळे राजाच्या सर्व वस्तुही त्याला प्राप्त झाल्या. अगदी याच पद्धतीने जो मनुष्य सर्वकाही देणाऱ्या देवाला प्राप्त करतो, त्याला सर्वकाही प्राप्त होते. पण या देवाला प्राप्त केले नाही तर सर्वकाही गमावण्याची पाळी आपल्यावर येते.

**- स.वि.लव्हटे**
जुईनगर, नवी मुंबई.